# भारत फोर्जतर्फे पाण्याच्या टाक्या

## गोंदवले बुद्रुकमध्ये दोन ठिकाणी वेगाने काम सुरू



गोंदवले बुद्रुक (ता. माण) : भारत फोर्जच्या लीना देशपांडे यांच्या हस्ते पाण्याच्या टाकीचे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले.
(फिरोज तांबोळी : सकाळ छायाचित्रसेवा)

**गोंदवले, ता. २८ :** भारत फोर्जने आता गोंदवले बुद्रुकच्या विकासासाठी आगेकूच केली आहे. पहिल्याच टप्प्यात पिण्याच्या पाण्याची अडचण दूर करण्यासाठी सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून कंपनीच्या अधिकाऱ्यांनी स्थानिकांच्या उपस्थितीत नवीन टाक्यांच्या कामाचे भूमिपूजन केले.

भारत फोर्ज कंपनीच्या सीआरएस फंडातून विविध गावांत विकासकामे सुरू आहेत. गोंदवले बुद्रुक (ता. माण) येथे काही महिन्यांपूर्वीच कंपनीने सर्वेक्षण केले होते. पहिल्या टप्प्यात उमाजी नाईक चौकात दीड लाख लिटर व बनवडीवस्तीत एक लाख लिटर पाणी साठवण क्षमतेच्या पाण्याच्या टाक्यांचे काम मंजूर झाले. या कामांचे भूमिपूजन भारत फोर्ज सामाजिक दायित्व विभागप्रमुख लीना देशपांडे, जयदीप लाड, बाळासाहेब माने, अश्विनी कट्टे, संजय माने, सूरज पाटील, सतीश अवघडे, राजेंद्र कट्टे, बाळासाहेब पाटील, अंगराज कट्टे, डॉ. रज्जाक तांबोळी, ग्रामविकास अधिकारी अमोल पवार यांच्या उपस्थितीत झाले.

लीना देशपांडे म्हणाल्या, "ग्रामविकासातून देशाचा विकास या संकल्पनेतून भारत फोर्जच्या सामाजिक दायित्वातून आम्ही काम करत आहोत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक संकटांना तोंड देत ग्रामविकासाची कामे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात ग्रामस्थांची भूमिका महत्त्वाची आहे.'' शहाजीराव क्षीरसागर यांचेही भाषण झाले. यावेळी पोपटराव फडतरे, विवेक कट्टे, बाळासाहेब सोनवणे, राजेंद्र साळुंखे, डॉ. अतुल फडतरे उपस्थित होते. विनोद मोहिते यांनी सूत्रसंचालन केले.



CS Scanned with CamScanner